दिवाणी नियमीत मुकदमा कमांक 56/2010 मधील नि.5 वरील आदेश.

1. यातील वादीने ठराव होवून मिळणेकरीता व निरंतरचे ताकीदी करीता दावा दाखल केलेला आहे. ज्यामध्ये त्यांनी प्रतिवादी नंबर 1 विरुध्द तुर्तातुर्त ताकीदीचा हुकूम मिळणेसाठी अर्ज दिलेला आहे.

2. अर्जाची थोडक्यात हकीकत खालीलप्रमाणे :–

वादी नंबर 1 व 2 हे बहिण भावंडे आहेत. दाव्यातील मिळकत ही त्यांना त्यांची आई मयत सुनंदा सुभाष पवार हीने दिनांक 11/2/2003 रोजी मृत्यूपत्राने दिली आहे. प्रतिवादी नंबर 2 ते 6 यांनी प्रतिवादी नंबर 1 कडून व्यवसायासाठी कर्ज घेतले होते व त्या कर्जाकरीता दावा मिळकत प्रतिवादी नंबर 1 जप्त करणार असे वादींना समजले. वास्तविक प्रतिवादी नंबर 1 चा वादीच्या मालकीच्या दावा मिळकतीशी कोणताही संबंध नाही. प्रतिवादी नंबर 6 हे वादींचे वडील आहेत. तसेच प्रतिवादी नंबर 3 हे वादीचे आजोबा व प्रतिवादी नंबर 4 व 5 चे मामा आहेत. प्रतिवादी नंबर 3 ते 6 यांनी एकत्रात प्रतिवादी नंबर 2 ही कंपनी काढली होती. तसेच त्या कंपनीसाठी बॅन्केकडून कर्ज घेतले होते. परंतु ती कंपनी थोडया काळात बंद पडली. म्हणून प्रतिवादी नंबर 1 ने प्रतिवादी नंबर 3 ते 6 विरुध्द दावा केला. प्रतिवादी नंबर 3 ते 5 यांनी देखिल दावा मिळकत बॅन्केकडे तारण ठेवली. पुढे प्रतिवादी नंबर 1 ने प्रतिवादी नंबर 2 ते 6 विरुध्द डी.आर.टी. मुंबई येथे दावा करुन निकाल घेतला. याची माहीती वादींना जून 2009 चे अखेरीस समजली. सदरची कृती ही पुर्णपणे बेकायदेशिर आहे. वादींना त्यांचे आईने दावा मिळकती मृत्यूपत्राने दिलेली आहे. परंतु अद्याप वादींचे नांवे दाखल नाही. त्यामुळे दाव्याचा निकाल लागेपर्यन्त प्रतिवादी नंबर 1 ने वादीचे दावा मिळकतीमधील वहीवाटीस बाधा येईल अशी कृती करु नये.

3. प्रतिवादी नंबर 1 ला नोटीस व समन्स बजावले. परंतु ते गैरहजर राहीले. खालील मुद्दे चर्चेसाठी उपस्थित होतात. त्यावरील माझे निष्कर्ष मी त्यापुढे खालील थोडक्यात नमुद कारणांसाठी नोंदवित आहे.

| <u>मुद्दे</u> | <u>निष्कर्ष</u> |
| --- | --- |
| 1. वादी हे शाबीत करु शकतात काय की, प्रतिवादी नंबर 1 विरुध्द त्यांना प्रथमदर्शनी केस आहे ? | नकारार्थी |
| 2. दाव्याचा कल कोणाच्या बाजूने आहे ? | प्रतिवादी नं.1 च्या. |
| 3. कोणाचे न भरुन येणारे नुकसान होणार आहे ? | प्रतिवादी नं.1 चे. |
| 4. आदेश काय ? | अंतिम आदेशान्वये. |

–: <u>का र ण मि मां सा</u> :–

4. <u>मुद्दा कमांक 1 ते 3 करीता</u> :– वादीतर्फे वकीलांचा युक्तीवाद ऐकला. वादीच्या कथनावरुन एक गोष्ट लक्षात येते की, प्रतिवादी नंबर 1 व 2 आणि प्रतिवादी नंबर 6 यांचे एकत्र कुटूंब आहे. कंपनी काढण्यासाठी प्रतिवादींनी प्रतिवादी नंबर 1 ला कर्जाच्या तारणाकरीता दावा मिळकत तारण म्हणून दिली होती. ही गोष्ट वादींना माहीत नाही हे अतिषय चुकीचे आहे. तसेच प्रतिवादी नंबर 1 कडून हे जे कर्ज घेतले आहे त्या कर्जाची रक्कम वादींनी मुद्दाम दाव्यात लिहीलेली नाही. ही गोष्ट वादींनी लपवून ठेवलेली आहे. तसेच वादींच्या आईनी प्रतिवादीने कर्ज घेतल्यानंतर वादींच्या नावाने मृत्यूपत्र केलेले आहे. म्हणून येथे वादी, प्रतिवादी नंबर 6 आणि वादींची मयत आई सुनंदा यांनी संगनमताने व कर्ज बुडविण्याच्या दृष्टीने दावा मिळकतीं या वादींच्या नावाने हस्तांतरीत केलेल्या आहेत. असे त्यांना करता येणार नाही. दुसरी गोष्ट म्हणजे वादींनी या दाव्यात विनंती कलमा मध्ये प्रतिवादी नंबर 1 ने जप्त लिलाव करु नये असे लिहीले आहे. याचा अर्थ वादीने या दाव्यामध्ये डी.आर.टी. मुंबई च्या प्रकरणाला आव्हान दिलेले आहे. तसे वादींना करता येणार नाही. कारण ते

आव्हान या न्यायालयाच्या न्यायकक्षेत येत नाही. त्यामुळे वादींनी प्रतिवादी नंबर 1 च्या विरुध्द प्रथमदर्शनी केस शाबीत केलेली नाही. दाव्याचा कल प्रतिवादी नंबर 1 चे बाजूने आहे. तुर्तातुर्त ताकीद दिली तर प्रतिवादी नंबर 1 चे नुकसान होणार आहे. त्यामुळे मी वरीलप्रमाणे मुद्यांचे निष्कर्ष दिलेले आहेत व खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## <u>आ दे श</u>

1. वादींचा निशाणी 5 चा अर्ज नामंजूर करणेत येत आहे.
2. अर्जाचा खर्च दाव्याचे खर्चात समाविष्ठ करणेत यावा.

दिनांक :– 20/10/2010
ठिकाण :– खेड

(नि.र.मनगिरे)
दिवाणी न्यायाधीश (क.स्तर)
खेड.